Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक २९] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ३-९, २०२०/अग्रहायण १२-१८, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३५.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० ऑक्टोबर २०२०.

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२२१९-२४५९-प्र.क्र. ६५–२०२०-नावि-९.—

ज्याअर्थी, ब्रम्हपुरी शहराची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१(१) अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२२९९-१००१-प्र. क्र. १११, नवि-९, दिनांक २८ जून २००२ अन्वये मंजूर झालेली असून सदर विकास योजना दिनांक २६ ऑगस्ट २००२ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजा देलनवाडी येथील सर्व्हे क्र. ७८(पैकी), ७९(पैकी), ८४(पैकी), ९०(पैकी), ९७(पैकी), ९८(पैकी), ९९(पैकी), क्षेत्र २.९७ हेक्टर ही जागा आरक्षण क्र. ५८ "क्रिडांगण" या विभागात समाविष्ट आहे. (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, ब्रम्हपुरी नगर परिषद, ब्रम्हपुरी यांनी उक्त जागेच्या संदर्भात नियोजन प्राधिकरण (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे) म्हणून, त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १३, दिनांक ११ जून २०१८ नुसार उक्त आरक्षणामधून सर्व्हे क्र. ७८ (पैकी) मधील अंदाजे क्षेत्र ०.५० हेक्टर वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत प्रस्तावित करण्याचे ठरवून उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव दिनांक ३० जानेवारी २०१९ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे. (यापुढे "उक्त प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर नियोजनाच्या दृष्टीकोनातून उक्त फेरबदल प्रस्ताव नामंजूर करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्ताव नामंजूर करीत आहे ;

सदर अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ मुख्याधिकरी, ब्रम्हपुरी नगर परिषद, ब्रम्हपुरी यांचे कार्यालयांत, कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी उपलब्ध करण्यात येत आहे;

सदरची अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in** (कायदे व नियम) या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**वीणा मोरे,**
अवर सचिव.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३६.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
Mantralaya, Mumbai-400 032, Dated 20th October 2020.

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No. TPS-2219-2459-CR-65-2020-UD-9.—

Whereas, the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2299-1001-C.R.-111-UD-9, dated 28th June 2002 has sanctioned the Development Plan for the Bramhapuri Town & came into force with effect from the 26th August 2002 ( hereinafter referred to as " the said Development Plan") under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah XXXVII of 1966) ( hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, the land bearing Survey Nos.78(pt.), 79(pt.), 84(pt.), 90(pt.), 97(pt.), 98(pt.), 99(pt.), admeasuring area 2.97 Ha. of Mouja Delanwadi are Reserved for Site No. 58 "Play Ground" ( hereinafter referred to as "the said Reservation");

And whereas, the Bramhapuri Municipal Council, being the Planning Authority in respect of the said land ( hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* its Resolution No. 13, dated 11th June 2018 has resolved to deleted the approximately area 0.50 Ha. from Survey No. 78(pt.) of the said Reservation and to include in Residential Zone by carrying out a modification to the said Development Plan, by following all the legal formalities stipulated under Section 37(*1*) of the said Act and forwarded the proposal to Government for sanction *vide* letter dated 30th January 2019 ( hereinafter referred to as "the said Modification" ) ;

And whereas, in view of above and after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune from the planning point of view the Government is of opinion that the said Modification needs to be rejected ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby refuses to accord sanction to the said Modification ;

This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours in the Office of the Chief Officer, Bramhapuri Municipal Council, Bramhapuri, Dist. Chandrapur ;

This Notification shall also be available on the Government website *www.maharashtra.gov.in.* ( Act and Rules)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VEENA MORE,
Under Secretary.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.